जा.क्र. मसंके/विकास/260/2026
दिनांक :- 04/06/2026

# लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वी.अकोला अंतर्गत असलेल्या **पश्चिम, गुडधी, मलकापुर व म.सं.के परिसरात** असलेल्या **शेततलावाचा मत्स्यपालनासाठी** जाहीर लिलाव दि. १६/०६/२०२६ रोजी स १०.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर शेततलावाचा **मत्स्यपालनासाठी** जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत **सामान्य विभाग** या कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील शेततलावाची पूर्व पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. ०८.०६।२०२६ ते १५.०६.२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वी.अकोला या कार्यालयामध्ये जमा करावे.** लिलावधारकांच्या समक्ष दि. १६.६.२०२६ रोजी सकाळी १०.३० लिलाव बोलीचे बंद लिफाफे उघडण्यात येतील व विभागानुसार सर्वात जास्त (बोली) रक्कम असेल त्या लीलावधारकास शेततलाव मत्स्यपालनाकरिता दिल्या जातील. करिता इच्छुकांनी सदर लिलावामध्ये भाग घेण्याकरिता स्वखर्चाने अटी व शर्तीचे अधीन राहून जास्तीत जास्त संख्येने हजर राहावे.

शेततलावाचे विवरण व बंद लिफाफ्यामध्ये भरावयाचा नमूना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं | विभागाचे नाव | शेततलाव आकार | लिलाव (बोली) रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१. | पश्चिम विभाग | २००x१८०x५ मीटर | |
| ०२. | मलकापुर विभाग | १२०x७५x५ मीटर | |
| | | ३१५x९०x५ मीटर | |
| ०३. | गुडधी विभाग | १००x१००x३ मीटर | |
| ०४. | म.सं.के परिसर | १०० x१००x५ मीटर | |

लिलावाच्या अटी व शर्ती मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभागाचे तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेले आहे.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र,
डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला

# जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वी.अकोला अंतर्गत असलेल्या **पश्चिम, गुडधी, मलकापुर व म.सं.के परिसरात** असलेल्या शेततलावाचा **मत्स्यपालनासाठी** जाहीर लिलाव दि. १६/०६/२०२६ रोजी स १०.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर शेततलावाचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभाग कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

- **पश्चिम, गुडधी, मलकापुर व म.सं.के परिसरात** असलेल्या शेततलावाचा **मत्स्यपालनासाठी** जाहीर लिलावात समावेश आहे.
- इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील शेततलावाची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि.०८.०६.२०२६ ते १५.०६.२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला कार्यालयामध्ये जमा करावे.**
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना **रुपये २००० /- अनामत रक्कम** म्हणून **दिनांक १६.०६.२०२६** रोजी लिलावाच्या दिवशी नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी रु. २००० अनामत रक्कम भरली असेल त्यांनी फक्त लिलावाच्या ठिकाणी हजर राहता येईल .इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही .विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- शेततलावाची अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील . बोली बोलणाऱ्यापैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल ,त्यांना लिलाव समिती मान्यता देईल. व याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार **मा. संचालक ,मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला** यांनी राखून ठेवला आहे.
- लिलावधारकास लिलावाची **१००% रक्कम लिलावाच्या दिवशीच** रोखीने संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे त्वरित भरावी लागेल.
- लिलावधारकास अंतिम बोलीच्या म्हणजेच लिलाव रकमेच्या **१०% रक्कम सुरक्षा ठेव** म्हणून जमा करावी लागेल. सदर सुरक्षा ठेव रक्कम लिलावाच्या अंतिम मुदतीनंतर परत करण्यात येईल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल .तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील .
- **मस्त्यपालन करताना** शेततलावाला हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल .शेततलावाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल .व ह्या बाबतचा अंतिम निर्णय **मा .संचालक ,मध्यवर्ती संशोधन केंद्र , डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला** यांचे कडे राहील .
- शेततलाव **मत्स्यपालनाकरिता २ वर्षासाठी** देण्यात येतील. व संबंधित कंत्राटदारास १०० रु स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे आणि संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहण्याबाबत करारनामा सबंधित विभागाकडे लिलाव झाल्यापासून ७ दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक राहील.
- ठेकेदारास विभागावरील शेततलावाची रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी **पश्चिम, गुडधी, म.सं.के परिसर व मलकापुर विभाग** यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल.प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- शेततलावाची रखवाली ठेकेदारास स्वत :करावी लागेल राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही .याची दक्षता घ्यावी , तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र,**
**डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला**